पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 11/01/2019 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

## पोलिस अधीक्षक श्री. राकेश ओला यांच्या हस्ते उद्‌घाटन
## इंडियन ऑईल कॉ. लि.च्या 'ग्राहक दिवस' कार्यक्रमाचे

दिनांक 09/01/2019 रोजी इंडियन ऑईल कॉपोरेशन लिमिटेड, नागपूर मंडळातर्फे जिल्ह्यातील विविध पेट्रोल पंप धारकांसाठी 'ग्राहक दिवस' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रिझर्व्ह बँक चौक येथे या कार्यक्रमाचे नागपूर ग्रामीण पोलिस अधीक्षक श्री. राकेश ओला यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे पोलिस उपअधीक्षक (गृह) श्री. कैलाश गावडे आणि सितारवादक अवनींद्र शैलीकर यांची उपस्थिती होती. ग्रामीण पोलिस अधीक्षक श्री. राकेश ओला यांनी केक कापून कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी ग्रामीण पोलिस अधीक्षक श्री. राकेश ओला यांनी ग्राहकांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. या कार्यक्रमात इंडियन ऑईल कॉपरेशनचे श्री. नितिन रोडगे (उप महाप्रबंधक), श्री. मनीष नांदले (वरिष्ठ प्रबंधक–रीटेल सेल्स), श्री. जी के. देशमुख (वरिष्ठ प्रबंधक–रीटेल सेल्स, नागपुर, श्री. दिलीप तिरके आणि श्री. नितिन तामनकर, कोको इंचार्जसह यांची उपस्थिती होती. सदर कार्यक्रम इंडियन ऑईल कॉपोरेशन लिमिटेड, नागपूर मंडळातील संपूर्ण जिल्ह्यातील मुख्यालय व पेट्रोल पंपावर आयोजित करून ग्राहकांना सन्मानित करण्यात येत आहे. ग्रहाकांना उच्च सेवा देण्यासाठी इंडियन ऑईल कॉपोरेशन लिमिटेड, नागपूर मंडळ अग्रणी आहे.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर